केरळ राज्यात पावसामुळे उद्भावलेल्या नैसर्गिक आपत्तीग्रस्त नागरिकांना मदत म्हणून राज्यातील सर्व भा.प्र.से.,भा.पो.से., भा.व.से. व महाराष्ट्र राज्य शासनाचे सर्व अधिकारी / कर्मचारी यांच्या माहे सप्टेंबर,२०१८च्या वेतनातील एक दिवसाचे वेतन मुख्यमंत्री सहायता निधीमध्ये देणगी म्हणून उपलब्ध करुन देण्याबाबत.....

**डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला**
**अर्थ प्रशासन विभाग**
**पी.ओ. कृषि नगर, अकोला -४४४ १०४ (महाराष्ट्र)**

जा.क्र.अप्रवि/मु.सहा.निधी/ 976 /२०१८ दिनांकः26 /०९/२०१८

**वाचा :** १) शासन परिपत्रक क्रमांकः संकिर्ण-१११८/प्र.क्र.३७८/१६-अ, दि.२७ ऑगस्ट,२०१८.
२) या कार्यालयाचे आदेश जा.क्र. आस्था/९५६/२०१८, दि.१९/०९/२०१८.

## परिपत्रक

उपरोक्त शासन परीपत्रकास अनुसरुन केरळ राज्यात पावसामुळे उद्भावलेल्या नैसर्गिक आपत्तीग्रस्त नागरिकांना मदत म्हणून संबंधीत शासन परिपत्रकान्वये अमलबजावणी करण्यासंदर्भात विद्यापीठातील सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांना कळविण्यात आले होते.

त्या अनुषंगाने विद्यापीठातील व विद्यापीठ संलग्न अनुदानित संस्थातील सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांना सुचित करण्यात येते की, आपल्या अधिनस्त असलेल्या अधिकारी / कर्मचारी यांचा एक दिवसाचा पगार सबंधीत शासन परिपत्रकामध्ये निर्देशित केलेल्या कार्यपध्दतीचा अवलंब करुन रोखिने मुख्यमंत्री सहायता निधी बँक खात्यात जमा करुन प्राप्त होणाऱ्या पोचपावतीची प्रत व देणगीदारांची यादी (दोन प्रतीत) मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष, मुख्यमंत्री सचिवालय, ६ वा माळा, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई - ४०००३२ यांच्याकडे निश्चित प्राप्त होईल अशा प्रकारे रकमेचा भरणा केल्याच्या दिनांकापासून ७ दिवसाच्या आत परस्पर पाठवावी. ज्या अधिकारी / कर्मचाऱ्यांनी मासिक वेतनातून रक्कम वसून करण्यास हरकत घेतली असेल त्यांचेकडून तशा आशयाचे वैयक्तिक पत्र सबंधीत आहरण व सवितरण अधिकाऱ्यांनी प्राप्त करुन घ्यावे तसेच अशा अधिकारी / कर्मचारी यांचे वेतनातून कपात करु नये व त्या सबंधीच्या तपशिलासह कपात केलेल्या रकमेच्या तपशिलाची एक प्रत सबंधीत आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी वेतन व लेखाधिकारी कार्यालयास (अकोला / नागपूर) दि.२९/०९/२०१८ पूर्वी पाठवावी.

मागील पानावर........

मुख्यमंत्री सहायता निधी यांची वेबसाईट WWW.cmrf.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर भरणा करावा किंवा मुख्यमंत्री सहायता निधी बॅंक खात्याचा तपशील खालील प्रमाणे असून त्यात भरणा करावा.

| | |
|---|---|
| मुख्यमंत्री केरळ पुरग्रस्त सहायता निधी, बॅंक ऑफ महाराष्ट्र,<br>बचत खाते क्रमांक ६०३१२९७८१४९<br>मंत्रालय शाखा, मुंबई -३२.<br>IFC code : MAHB ०००१३८८<br>MICR Code : ४०००१४०६९ | Chief Minister Kerala Flood Relief Fund<br>Bank of Maharashtra,<br>Saving Account No. 60312978149<br>Mantralaya Branch, Mumbai-32.<br>IFC code : MAHB 0001388<br>MICR Code : 400014069 |

इतर अटी / शर्ती तथा कार्यपध्दतीसाठी उपरोक्त शासन परिपत्रकाचा अवलंब करण्यात यावा.

नियंत्रक
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ
अकोला

प्रत :१) सर्व विभागप्रमुख/आहरण व संवितरण अधिकारी, डॉ.पं दे.कृ.वि., अकोला / नागपूर.

२) मा.कुलगुरु महोदय यांचे स्वीय सहायक, डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला यांना मा.कुलगुरु महोदय यांचे माहितीस्तव.

३) कुलसचिव, डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला यांना माहितीस्तव.

४) वेतन व लेखाधिकारी, डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला / नागपूर यांनी **त्यांच्याकडे प्राप्त अहवाल एकत्रित करुन मा.मुख्यमंत्री सहायता निधीमध्ये जमा केलेल्या रकमेचा तपशिल दि.०१/१०/२०१८ रोजी या कार्यालयास सादर करावा.**

५) प्रभारी अधिकारी, संगणक प्रणाली कक्ष, डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला यांना विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसारणाकरीता.

नियंत्रक